मुख्य विद्युत निरीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

क्र. याचिका-२०१९/प्र.क्र.३४ (भाग-२)/ऊर्जा-५

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: ०९ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना:

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालय शाखेतील मुख्य विद्युत निरीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यानुषंगाने श्री. दिनेश ज. खोंडे, अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, औरंगाबाद यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ, नागपूर येथे मूळ अर्ज क्र. २६/२०१९ दाखल केला आहे. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी शासनास अहवाल सादर करण्यासाठी विभागाच्या प्रधान सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्याबाबत मा. मंत्री (ऊर्जा) यांनी निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने मुख्य विद्युत निरीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालय शाखेतील मुख्य विद्युत निरीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

(१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग	- अध्यक्ष
(२) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	- सदस्य
(३) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग	-सदस्य
(४) प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग	- सदस्य
(५) उप सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	- सदस्य सचिव

२. उपरोक्त समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालय शाखेतील मुख्य विद्युत निरीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यानुषंगाने शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२२०१८/ प्र.क्र.२०८/कार्या-१२, दि. ०५/०९/२०१८ मधील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन शासनास अहवाल सादर करणे.

३. समितीचा कार्यकाल आदेशाच्या दिनांकापासून १ आठवडा इतका राहील, तथापि समितीने आपला अहवाल हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून तातडीने बैठक घेऊन शासनास सादर करावा.

४.   हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९०९१०५९०९४२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundlik Badgeri

Digitally signed by Prashant Pundlik Badgeri
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=07ae22a8e7fa4047ce6ff816d85e77eec14db9926b325a140acf9b28bb990786, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundlik Badgeri
Date: 2019.09.09 13:00:53 +05'30'

(प्रशांत पुं. बडगेरी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद /विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४००३२.
७. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
८. प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
९. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१०.प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
११.उप सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१२.निवडनस्ती (ऊर्जा-५).